महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मासं/रवका/न.क्र.०९ /
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५९ दि. ०५/०६/२०२३

**विषय: मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री यांना लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडुन प्राप्त होणारी पत्रे/ निवेदनांवरील सामासिक निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ:** १.म.रा.वि.मंडळ प्रशासकीय परिपत्रक क्र.१४८ दि.१८.०८.१९९५.
२. म.रा.वि.मंडळ प्रशासकीय परिपत्रक क्र.३८६ दि.२०.०३.२००३.
३. म.रा.वि.मंडळ प्रशासकीय परिपत्रक क्र.४३० दि.२०.०९.२००४.
४. महावितरण कंपनी प्रशासकीय परिपत्रक क्र.२०७ दि.०५.०२.२००९

मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री यांना लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडुन विविध विषयांसदर्भात निवेदने/ पत्रे प्राप्त होत असतात. सदर निवेदन/ पत्रांवर मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री शेरे नोंदवितात व ती निवेदने संबंधित विभागास पाठविली जातात. निवेदनांवर देण्यात आलेले शेरे फक्त निवेदनातील माहितीवर आधारित असतात. प्राप्त झालेली निवेदने/पत्रांमध्ये निवेदन देणाऱ्याची बाजू मांडलेली असते. यासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, अशा निवेदन/ पत्रांवरील सामासिक शेरे/ निर्देशानुसार विभागीय प्रमुख यांच्या स्तरावर परस्पर आदेश निर्गमित केले जातात. निवेदन/ पत्रावरील मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री यांच्या शेऱ्यानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.१००/१८ (र. व का.) दि.१० सप्टेंबर, २०१५आणि शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.१३१/१८ (र. व का.) दि.०३ नोव्हेंबर, २०१५ च्या परिपत्रकांन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र.२०७ दि.०५.०२.२००९ अन्वये खासदार, आमदार आणि अति महत्वाच्या व्यक्ती यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रांची तात्काळ पावती देण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. तसेच अशी सर्व पत्रे ज्यामध्ये सर्वसामान्य नागरिक यांच्या विविध विषयासंदर्भात निवेदने/पत्रे व स्थानिक महत्वाच्या बाबींचा समावेश आहे, त्यांचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे आणि १५ दिवसांच्या मर्यादित कालावधीत उत्तर देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येवूनही खासदार, आमदार आणि अति महत्वाच्या व्यक्ती यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रांची तात्काळ पावती किंवा त्याचे उत्तर देण्याची कार्यवाही केली जात नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१३१/१८(र.व.का.) दि.१०.०१.२०२३ अन्वये मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री यांच्या कार्यालयांकडून शेऱ्यांसह प्राप्त होणारे अर्ज/ पत्र/ निवेदने यांची नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकातील तरतुदींनुसार गुणवत्तापूर्ण तपासणी करुन त्यांचा परिणामकारक निपटारा व्हावा आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, याकरिता अशा शेऱ्यांसह प्राप्त

होणारे अर्ज/ पत्र/ निवेदनांवरील शेऱ्यानुसार करावयाच्या कार्यवाही संदर्भात संबंधित विभाग/ कार्यालय यांनी निवेदनातील विनंती मान्य करणे योग्य होईल किंवा अमान्य करावी लागेल याबाबत (सक्षम अधिकारी यांच्या मंजूरीने) निष्कर्षाप्रत पोहचल्यानंतर संबंधित विभागाने/ कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

४. सबब, महावितरण कंपनीतील सर्व कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करण्यात येते की, मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/ मंत्री यांच्या कार्यालयांकडून शेऱ्यांसह प्राप्त होणारे अर्ज/ पत्र/ निवेदनांवरील शेऱ्यानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात दि.१०.०१.२०२३ च्या शासन परिपत्रकामधील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत**: शासन निर्णय दि. १०.०१.२०२३.

( भूषण कुलकर्णी )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / मुख्य तपास अधिकारी / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य अभियंता (देयके व महसुल), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांना लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून प्राप्त होणारी पत्रे/निवेदनांवरील सामासिक निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण - २०१५/प्र.क्र.१३१/१८(र. व का.)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०२३.

**वाचा :-**१) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र.१००/१८(र.व का.), दिनांक १० सप्टेंबर, २०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र.१३१/१८(र.व का.), दिनांक ०३ नोव्हेंबर,२०१५.

**प्रस्तावना :-**

मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांना लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून विविध विषयांसंदर्भात निवेदने/पत्रे प्राप्त होत असतात. सदर निवेदन/पत्रांवर मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/मंत्री शेरे नोंदवितात व ती निवेदने संबंधित विभागास पाठविली जातात. निवेदनांवर देण्यात आलेले शेरे फक्त निवेदनातील माहितीवर आधारित असतात. प्राप्त झालेली निवेदने/ पत्रांमध्ये निवेदन देणा-याची बाजू मांडलेली असते. यासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, अशा निवेदन/पत्रांवरील सामासिक शेरे/निर्देशानुसार विभागीय प्रमुख यांच्या स्तरावर परस्पर आदेश निर्गमित केले जातात. निवेदन/पत्रावरील मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांच्या शे-यानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर, २०१५ आणि दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ च्या परिपत्रकांन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांच्या कार्यालयांकडून शे-यांसह प्राप्त होणारे अर्ज/पत्र/ निवेदने यांची नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकातील तरतुदींनुसार गुणवत्तापूर्ण तपासणी करून त्यांचा परिणामकारक निपटारा व्हावा आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, याकरिता अशा शे-यांसह प्राप्त होणारे अर्ज/पत्र/निवेदनांवरील शे-यानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात एकत्रित स्वरूपात आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांच्या कार्यालयांत लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून प्राप्त होणारी निवेदने/पत्रांवर मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांनी दिलेल्या शेऱ्यांनुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात आता खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत :-

१. मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री/ यांच्या कार्यालयाकडून लोकप्रतिनिधी/मान्यवर/नागरिक यांची निवेदने त्यावरील मा. मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांच्या सामासिक शेरे/निदेशांसह प्राप्त झाल्यानंतर

अशा निवेदनातील विनंतीची संबंधित विभाग/कार्यालयाने सदर विनंतीच्या अनुषंगाने लागू असणारे प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय, परिपत्रके यांतील तरतुदींच्या आधारे सखोल तपासणी करावी, अशा तपासणीसाठी आवश्यकतेनुसार क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यास हरकत नाही. अशा तपासणीअंती संबंधित विभाग/कार्यालय निवेदनातील विनंती मान्य करणे योग्य होईल किंवा अमान्य करावी लागेल अशा निष्कर्षाप्रत पोहचू शकेल. अशा निष्कर्षाप्रत पोहचल्यानंतर संबंधित विभागाने/ कार्यालयाने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे:-

अ) ज्या निवेदनामधील विनंती/मागणी प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय यांच्या आधारे तपासल्यानंतर अशी विनंती मान्य करणे योग्य ठरेल अशा निष्कर्षाप्रत आल्यानंतर संबंधित विभाग/ कार्यालयाने सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने तसा निर्णय घेऊन तो संबंधित निवेदनकारास कळवावा. तसेच अशा निवेदनावर सामासिक शेरा/निदेश देणाऱ्या मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री यांना सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करावे.

ब) ज्या निवेदनांमधील विनंती प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय यांच्या आधारे तपासल्यानंतर अशी विनंती मान्य करता येणार नाही, अशा निष्कर्षाप्रत आल्यानंतर संबधित विभाग/ कार्यालयाने ही वस्तुस्थिती प्रथमतः अशा निवेदनावर सामासिक शेरा लिहिणाऱ्या मा.मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री/मंत्री यांना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत अवगत करावी व त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्णय घेऊन असा निर्णय संबंधित निवेदनकारास कळविण्यात यावा.

२. उपरोक्त प्राप्त निवेदने/पत्रे यांमधील विषय/बाब ही धोरणात्मक बदलांशी संबंधित असल्यास व असा बदल करणे संबंधित विभागाच्या मते आवश्यक असल्यास, अशा बाबी/विषयासंदर्भात संबंधित विभागांनी विहित मार्गाने समर्थनासह प्रस्ताव संबंधित मा.मंत्री/मा.उपमुख्यमंत्री/मा.मुख्यमंत्री यांना सादर करावेत.

३. कोणत्याही परिस्थितीत निवेदनावरील मा.मुख्यमंत्री/मा.उपमुख्यमंत्री/मा.मंत्री यांचा शेरा हा सदर प्रकरणाविषयी अंतिम निर्णय समजण्यात येऊ नये.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०११०१८२२४२०६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=04f6ff0d1ef522f4e19358cfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, pseudonym=0F4316152AE9704C9E34CC2EF2A8EB14A7151070, serialNumber=F49173DCDA3F795FF41A69777F5A6C2DED24F621CD434ABBB169565D1ABDAA1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2023.01.10 18:26:15 +05'30'

**( सुजाता सौनिक )**
अपर मुख्य सचिव

**प्रत-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.

८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१०. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.

१३. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१४. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१५. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (अपील), मुंबई.

१६. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.

१७. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, १ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.

१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई-४०० ०२३.

१९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

२०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

२१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.

२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

२३. सर्व विभागीय आयुक्त.

२४. सर्व जिल्हाधिकारी.

२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२६. मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

२७. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बराक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.

२८. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.

२९. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई -४०० ०३८.

३०. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.

३१. बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, भूखंड क्र. ८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.

३२. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग,
मुंबई -४०० ००४.

३३. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३.

३४. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.

३५. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग.